# धर्मवीर संभाजी अर्बन को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय : ३९१, दि मेलांगे, मुंबई-पुणे रस्ता, फुगेवाडी, पुणे - ४११०१२

## २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(केवळ सभासदांसाठी)

धर्मवीर संभाजी अर्बन को-ऑप. बँक लि. पिंपरी-चिंचवड या बँकेची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २४-९-२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता एसकेएफ युनियन सभागृह, चिंचवड टेल्को समोर, गावडे कॉलनी, चिंचवड, पुणे-३३ येथे अध्यक्ष श्री. बाबूराव विठ्ठलराव शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २५-९-२०२२ रोजीचे वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२२-२३ अखेरच्या मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या वार्षिक अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.
३. दि. ३१ मार्च २०२३ चा वैधानिक लेखापरीक्षण झालेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. सन २०२२-२३ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
५. सन २०२२-२३ चे वैधानिक लेखापरीक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद करणे.
६. सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२३-२४ वर्षाकरिता संचालक मंडळाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकाची माहिती घेणे.
७. सन २०२३-२४ या वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक यांचे केलेल्या नियुक्तीस मान्यता देणे.
८. सन २०२३-२४ व सन २०२४-२५ करिता अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करण्याकरिता संचालक मंडळास अधिकार देणे.
९. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाइकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
१०. सन २०२२-२३ या वर्षात शासनाचे एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत तडजोड केलेल्या कर्जाची माहिती घेणे.
११. मयत/पिडीत कर्जदाराचे १००% तरतूद असलेल्या संशयित व बुडीत वर्गवारीतील कर्जखात्याच्या वसुलीचा हक्क अबाधीत ठेवून कर्जे निर्लेखित करण्यास मान्यता मिळणे बाबत.
१२. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे.
१३. सदर वार्षिक सभेस अनुपस्थितीत असलेल्या सभासदांची रजेस मान्यता देणे.
१४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
**किसन कृष्णाजी इंगळे,**
सरव्यवस्थापक (प्र.)

दिनांक : ९ सप्टेंबर २०२३, पुणे

## सूचना

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी सकाळी १०.३० वा. घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचे कामकाज होईल.
२. सन २०२२-२३ चा ताळेबंद व नफातोटा पत्रक, वार्षिक अहवाल बँकेच्या वेबसाईट www.sambhajibank.com वर प्रसिध्द करण्यात आला आहे.
३. ३१ मार्च २०२३चा ताळेबंद, सन २०२२-२३चे नफा-तोटा पत्रक व वैधानिक लेखापरीक्षक यांचा सन २०२२-२३च्या वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या मुख्यालयात १५ सप्टेंबर २०२३ पासून कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.
४. सभेच्या वेळी विषयपत्रिकेतील बाबीसंबंधी विचारावयाची माहिती दि. २० सप्टेंबर २०२३ पर्यंत मुख्य कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत प्रश्नरुपाने लेखी कळविल्यास त्याप्रमाणे माहिती तयार ठेवणे सोईस्कर होईल.
५. बँकेच्या पोटनियम क्र. ११ (i) (b) अन्वये सभासदांनी रु. २५/- मुल्याचे एकुण ४० शेअर्स याप्रमाणे रु. १,०००/- इतक्या कमीत कमी रक्कमेची शेअर्स धारणा करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांकडे यापेक्षा कमी रक्कमेचे शेअर्स असतील त्यांनी या नियमानुसार भागधारणा रक्कमेची पुर्तता करावी.